ARTHA, Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 173

वर्ष ३४ | पुणे, बुधवार, १८ डिसेंबर, १९६८ | अंक १४



### डायरेक्टरांच्या हितासंबंधी फर्म्स-कंपन्यांकडून बँकांचे येणे

ज्या फर्म्स आणि कंपन्या ह्यांत डायरेक्टरांचे भागीदार, डायरेक्टर किंवा मॅनेजिंग एजंट ह्या नात्याने हितसंबंध आहे, अशांकडून हिंदी बँकांकडे १९६७ असेर एकूण २६०·६२ कोटी रुपयांचे येणे होते. काही बँकांच्या बाबतींत हे येणे त्यांच्या एकूण येण्यांच्या ०·१% होते, तर काही बँकांच्या बाबतीत ५१·७% होते. स्टेट बँक आणि बँक ऑफ बरोडा ह्यांच्या बाबतीत ते २३·९% होते.

### केसांचा रंग आता लिहिण्याचे कारण नाही

ब्रिटिश पासपोर्टासाठी अर्ज करणारांना अर्जात स्वतःच्या केसांचा रंग लिहावा लागतो. परंतु टोपांचा आणि कलपांचा वापर वाढलेला असल्यामुळे यापुढे अर्जदारांना केसांचा रंग लिहावा लागणार नाही.

### राजधानी एक्सप्रेस

दिल्ली आणि प्रत्येक राज्याची राजधानी ह्यांच्या दरम्यान एक 'राजधानी एक्सप्रेस' सुरू करण्याचा सरकारचा विचार आहे. दिल्ली ते कलकत्ता 'राजधानी एक्सप्रेस' प्रथम सुरू होईल.

### विमानतळावरील उतारूंची वरात

भारतातील चार प्रमुख विमानतळावर प्रवेश करणारांकडून ह्यापुढे एक रुपया प्रवेश-फी वसूल करण्यात येणार आहे. त्या फीचे समर्थन करताना पर्यटनमंत्री डॉ. करणसिंग लोकसभेत म्हणाले, "भारताखेरीज जगात दुसऱ्या कोणत्याही देशांत उतारूंना पोचविण्यासाठी एवढे नातेवाईक गर्दी करीत नाहीत. घरीच निरोप घेऊन एकट्यानेच विमानतळावर जाण्याची इतर देशांत पद्धत आहे."

### देवळांतून उंदरांना मेजवानी

भारतात, विशेषतः देवळांतून, उंदरांना भरपूर खायला घातले जाते त्यामुळे अन्नाचे दुर्भिक्ष्य निर्माण होते, अशी माहिती जर्मन वृत्तपत्रांतून आणि मासिकांतून प्रसिद्ध झाली आहे. त्याला अनुलक्षून पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी ह्यांनी बिकानेर येथील एका देवळाची हकीकत सांगितली. तेथे दररोज ५० किलो धान्य उंदरांना खाऊ घालण्यात येते.

### फिल्म फिनॅन्स कॉर्पोरेशनची कर्जे

फिल्म फिनॅन्स कॉर्पोरेशनने ३१ ऑक्टोबर, १९६८ असेर ६२ चित्रपटांसाठी एकूण १४७·४१ लक्ष रुपये चित्रपटनिर्मात्यांना दिले आहेत.


## आमचे ग्राहक, आणि नाराज ?

छेः ! आम्ही बेळगाव बँकेतील कर्मचारी आमच्या ग्राहकांना केव्हाही नाराज होऊच देत नाही; मग त्यांचे आमच्याकडे कसल्याही प्रकारचे काम असो ! महाराष्ट्र व म्हैसूर राज्य आणि गोवा येथील आमच्या ३८ शाखांच्यामार्फत आपले कोणत्याही प्रकारचे बँकिंगचे काम करण्यास आम्ही तत्पर आणि उत्सुक आहो. तुमचा आमच्याशी व्यवहार म्हणजे उभयतांना पूर्ण समाधान !

# दि बेळगाव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )

आपल्या नजीक असलेल्या आमच्या शाखेला आजच भेटा.

मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई ९.



दातांच्या स्वच्छतेसाठी

## ☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

☆ अर्थ ☆

बुधवार, १८ डिसेंबर १९६८



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । — कौटिलीय अर्थशास्त्र*

## आर्थिक विकासात शास्त्रीय संशोधनाचे स्थान

जमशेटपूर येथे लोहेतर धातुतंत्रज्ञानांतील आधुनिक घडामोडींसंबंधी एक परिसंवाद भरविण्यात आला होता. त्या निमित्ताने धातुविज्ञान शाखेतील २०० हिंदी प्रतिनिधी तेथे जमले होते. त्याशिवाय १२ परदेशी प्रतिनिधीही हजर होते. परिसंवादाचे उद्घाटन शास्त्रीय आणि औद्योगिक संशोधन मंडळाचे प्रमुख डॉ. आत्माराम ह्यांनी केले. ह्या प्रसंगी केलेल्या भाषणात ते म्हणाले की आर्थिक विकास घडवून आणतांना शास्त्रज्ञ व उद्योगपती ह्यांनी परस्परांच्या कार्याची ओळख करून घेतली पाहिजे. अशी ओळख असणे अतिशय अगत्याचे आहे. कारण, शास्त्रीय संशोधन ही काही एक जादूची कांडी नाही की जिच्या प्रभावाने संपत्ती आपोआप निर्माण होते. आर्थिक विकास घडून येताना शास्त्रीय ज्ञानाचा कशा रीतीने परिणाम होतो ह्याविषयीची फारशी जाणीव दिसून येत नाही. म्हणून उत्पादन वाढविण्याच्या कामात संशोधनाच्या व विकासाच्या महत्त्वाची जाणीव उद्योगपतींना असणे जरूर आहे. भारतामधील बहुतेक औद्योगिक संघटना इतक्या छोट्या असतात की त्यांना स्वतंत्र संशोधनाची व्यवस्था करता येणे शक्य नसते. मोठ्या उद्योगधंद्यांना मात्र ते शक्य आहे. टिस्को कंपनीने ह्या बाबतीत ३० वर्षापूर्वीपासून पुढाकार घेतलेला आहे.तंत्रज्ञानाच्या बाबतीत भारतापुढे एक महत्त्वाची समस्या उभी राहिलेली आहे. तंत्रज्ञानात प्रगत असलेल्या देशांनी ह्या बाबतीत केलेला विकास त्यांच्या गरजांना धरून असा सूक्ष्म आहे. हे तंत्रज्ञान भारताच्या परिस्थितीशी कसे जुळवून घ्यावे, हीच ती समस्या आहे.

---

## श्रीमंतांना साधेपणाने राहण्याची सूचना

मध्यवर्ती सरकारचे वाहतूकमंत्री डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव हैद्राबाद येथे उस्मानिआ विद्यापीठात भारतामधील आर्थिक नियोजनाला मिळत असलेल्या आव्हानाबद्दल बोलताना म्हणाले की, समाजातील श्रीमंतांनी राहणीचे मान वाढविण्याच्या आपल्या प्रयत्नांना ५ वर्षे तरी फाटा द्यावा. ह्या मार्गाने चवथ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी लागणारा पैसा गोळा करण्यास आणि बचत व गुंतवणूक ह्यांचा वेग वाढविण्यास मदत होईल. श्रीमंतांनी आपण होऊन आपल्या उत्पन्नावर मर्यादा घालून घेतली, समाजाच्या डोळ्यात खुपणारा खर्च टाळला आणि वैराग्यवृत्तीने जीवन कंठण्यास प्रारंभ केला तर त्याचा समाजातील बहुसंख्य इतर लोकांवर फार मोठा परिणाम होईल. भारतात आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी राष्ट्रीय स्वरूपाची चळवळ हाती घेण्याची वेळ आता आली आहे. या चळवळीत जनताजनार्दनाने भाग घेणे आवश्यक आहे. आर्थिक विकासाच्या चळवळीत लोक सामील झाले तर पैसा जास्तीत जास्त मोठ्या प्रमाणावर गोळा करता येईल आणि अधिकाधिक प्रमाणात कामधंदा उपलब्ध होऊ शकेल. भविष्यकाळ भरभराटीचा प्राप्त व्हावा म्हणून आजच्या घडीला दारिद्र्य सहन करण्यास लोक कितपत तयार आहेत, हा खरा प्रश्न आहे; आणि देशाच्या आर्थिक नियोजनाला ह्या प्रश्नाचे आव्हान आहे. तीन वर्षापूर्वी ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचे जे खरे मूल्य होते त्याच्या मानाने आजचे मूल्य बरेच कमी आहे. आजच्या कार्यक्रमाचे मूल्य २५,००० कोटींचे असले तरी गेल्या तीन वर्षांच्या काळात किंमतीत ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे आणि रुपयाची किंमत घटली आहे. चौथा कार्यक्रम २५,००० कोटींचा करण्यासाठी ४,००० कोटी रुपये अधिक जमविता आले पाहिजेत.

## आर्थिक प्रगतीत बँकांचे कार्य

रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर श्री. बी. एन. आडारकर मुंबई येथे बोलताना म्हणाले की, बँकिंग हा व्यवसाय सामाजिक सेवेचे एक महत्त्वाचे साधन म्हणून मानण्यात आला पाहिजे. आता बँकांवर सामाजिक नियंत्रण ठेवण्याचे धोरण स्वीकारण्यात आले आहे. त्यामुळे मध्यवर्ती बँकिंगच्या धोरणाची दिशा बरीच बदललेली आहे. व्यापारी बँकांच्या संघटनेतही मोठ्या प्रमाणावर बदल घडवून आणण्यात येत आहेत. व्यापारी बँकांच्या ठेवींविषयी आणि त्यांच्या वर्तणुकीविषयीच फक्त रिझर्व्ह बँकेला आस्था आहे असे मानण्याचे कारण नाही. देशाचे आर्थिक जीवन नियोजित करून त्याची वाढ घडवून आणण्याच्या कामीही व्यापारी बँकांनी आपले कर्तव्य बजावले पाहिजे. लोकांच्याजवळील पैसा बचतीच्या रूपाने गोळा करताना त्यांनी आर्थिक वाढ होण्यास उपकारक असे वातावरण निर्माण केले पाहिजे. बँकांकडील ठेवी ह्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या अवघ्या १५ टक्के आहेत. तेव्हा बँकांना आपले कार्य करण्यास अजून खूप मोठे क्षेत्र उपलब्ध आहे.

## निर्यात व्यापारातील काही नवी वैशिष्ट्ये

कलकत्ता येथील इंडिअन चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संघटनेने भारताच्या निर्यात व्यापाराची अलीकडे एक पाहणी केली आहे. १९६७–६८ सालातील भारताच्या परदेशी व्यापारातील काही नवी वैशिष्ट्ये ह्या पाहणीवरून लक्षात येतात. पाहणीवरून असे दिसते की भारताच्या सर्वात मोठ्या गिऱ्हाइकाची जागा ब्रिटनने पटकावली आहे. त्यापूर्वी ही जागा अमेरिकेची होती. १९६५-६६ सालापासून अमेरिकेने ह्या बाबतीत ब्रिटनला मागे सारले होते. त्यापूर्वी मात्र कित्येक वर्षे ब्रिटनच भारताचे मोठे गिऱ्हाईक होते. १९६६-६७ साली भारताने अमेरिकेला निर्यात केलेल्या मालाची किंमत २१९.०६ कोटी रुपये होती, ती गेल्या वर्षी २०६.२२ कोटी रुपयांपर्यंत घसरली. त्याच साली ब्रिटनला निर्यात केलेल्या मालाची किंमत गेल्या वर्षी निर्यात केलेल्या २०१ कोटी रुपयांवरून २२८.४५ कोटी रुपयांपर्यंत वाढली. भारताच्या कापडाच्या निर्यातीत पाकिस्तान अधिकाअधिक स्पर्धा करू लागला आहे. ब्रिटनला भारताकडून निर्यात केल्या जाणाऱ्या तंबाखूतही वाढ झाली आहे. १९६६-६७ साली १५.७ हजार मेट्रिक टन तंबाखू निर्यात करण्यात आली. ब्रिटनने ऱ्होडेशिआतून आयात होणाऱ्या तंबाखूवर बहिष्कार घातल्याने ही वाढ झाली असावी. गेली कित्येक वर्षे ब्रिटनला होणाऱ्या चहाच्या निर्यातीत घट होत होती. परंतु पाहणीच्या साली निर्यातीत वाढ झालेली दिसते. भारताकडून होणाऱ्या नेहमीच्या वस्तूंत बरीच घट झाली असली तरी कोल्हापुरी चपला, घड्याळे आणि सायकली ह्यांची निर्यात नव्याने झालेली आहे.

## स्विस बँका—चोरटे धंदे करणारांचे आश्रयस्थान

अमेरिकन चोरटे धंदेवाले, नफा दडविणारे व्यापारी, सट्टेवाले, करचुकार, ह्यांना स्विस बँकांची चांगलीच मदत होत असते. स्वित्झरलंडमध्ये बँकांसंबंधी गुप्ततेचे कडक कायदे आहेत. त्याचा फायदा घेऊन, स्विस बँकांचेमार्फत गुप्तपणे स्टॉक मार्केटमधील गुंतवणुकीचे व्यवहार केले जातात. त्यामुळे, अमेरिकेचे कोट्यवधी रुपयांचे करवसुलीचे नुकसान होते. शेकडा ९० अमेरिकन लोक आपली प्राप्ती सचोटीने कळवितात, त्यांचेवर त्यामुळे अन्याय होतो. हाँगकाँग, नॅस्यू, पश्चिम जर्मनी, येथेही बँकिंगच्या व्यवहारांच्या गुप्ततेचे कायदे आहेत. तेथेही अमेरिकन लोक पैशाचे चोरटे व्यवहार करतात. परंतु, न्यूयॉर्क आणि लंडन ह्यांच्या खालोखाल स्वित्झरलंड हे पैशाच्या व्यवहाराचे केंद्र असल्यामुळे तेथील व्यवहारांची झळ अमेरिकेला जास्त लागते. ज्या विदेशी बँका आपली हिशेबांची पुस्तके अमेरिकेच्या संबंधित खात्यासही दाखविण्यास तयार नाहीत, अशा बँकांशी व्यवहार करणे हा फौजदारी गुन्हा धरण्यात यावा, असे सुचविण्यात येत आहे.

## पगारवाल्यांच्या संख्येत होत असलेली वाढ

काम करून पोट भरणाऱ्या माणसाला मोबदला द्यावा लागतो. सुस्थिर व संघटित समाजात हा मोबदला पैशाच्या रूपात देण्यात येतो. पण त्या मोबदल्याला संज्ञा मात्र निरनिराळ्या देण्यात येतात. पगार, वेतन, मजुरी, मुशाहिरा, रोजमुरा, इत्यादी शब्द मोबदल्याच्या कल्पनेच्या निरनिराळ्या छटा दाखविणारे आहेत. तथापि, पगार ह्या शब्दाला विशेष प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे, मग तो कमी-अधिक कसाही असो. प्रगत देशांत तांत्रिक प्रगति एकसारखी होत असल्याने, तेथे रोजंदारीवर राबणाऱ्यांची संख्या कमी होऊ लागली असून पगारावर काम करणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. म्हणजेच अकुशल कामगार कुशल तंत्रज्ञ होऊ लागले आहेत. ही प्रवृत्ती अशीच चालू राहिली तर प्रगत समाजात तरी पगारवाले बहुसंख्य होतील व कामगार घटतील असा अंदाज आहे.

## अमेरिकेत समृद्धी शाप ठरणार काय?

अमेरिकन मेडिकल असोसिएशनच्या विश्वस्त मंडळाने आपल्या २२ व्या अहवालात अमेरिकन नागरिकांच्या आरोग्याविषयीच्या विपरीत कल्पना ग्रथित केल्या आहेत. अहवालात असे म्हटले आहे की, पुष्कळसे अमेरिकन लोक अत्यंत बेशिस्त असे जीवन जगतात आणि रोज नव्याने निघणारी अद्भुत औषधे आरोग्याचा लाभ करून देतील अशी व्यर्थ अपेक्षा करतात. समृद्धीमुळे अमेरिकनांची शारीरिक हालचाल कमी झालेली आहे, आणि आहार मात्र भलताच वाढला आहे. त्याशिवाय मद्यसेवन, धूम्रपान, जागरणे व औषधांचा उपयोग ह्यातही विलक्षण वाढ झालेली आहे. डॉक्टरने आरोग्यासंबंधी दिलेला सल्ला बऱ्याच वेळा मानला जात नाही; इतकेच नव्हे, तर त्याचा उपहासही केला जातो.

## वृंदावन एक्सप्रेसचा वेग वाढणार

म्हैसूरनजीक असलेली वृंदावन बाग ही भारतामधील रमणीय उद्यानात अग्रेसर मानली जाते. मुळातच कलात्मक पद्धतीने आखण्यात आलेल्या ह्या उद्यानात आठवड्यांतून ठराविक दिवशी रंगीबेरंगी विजेच्या दिव्यांची रोषणाई करण्यात येते. त्यामुळे उद्यानाचे सौंदर्य अधिकच वाढते. ह्या उद्यानाला भेट देण्यासाठी अनेक परदेशीय प्रवासी येतात. ते बहुधा विमानाने येतात. कारण, बंगलोर अगर मद्रासपासून येण्यासाठी विमानाने तास दीड तासाचा अवधी पुरतो. त्यामुळे मद्रास-बंगलोर वृंदावन एक्सप्रेसला थोडे प्रवासी मिळतात. ह्या गाडीचा वेग वाढवून मद्रास–म्हैसूर हे २२२ मैलांचे अंतर ३ तास व ४५ मिनिटांत तोडण्याची योजना आखण्यात आली आहे. विमानतळावर येण्यास व तेथून इच्छित स्थळी जाण्यास जो वेळ लागतो, तो लक्षात घेता, रेल्वेची गती वाढल्यावर फारसा फरक राहणार नाही.

**ब्रिटनमधील करचुकवे हिंदी लोक**—ग्रेट ब्रिटनमधील हिंदी आणि पाकिस्तानी लोकांनी गेल्या चार वर्षांत त्या सरकारचा सुमारे ६० कोटी रुपयांचा कर चुकविला आहे. आपली अपत्ये आणि अवलंबित कुटुंबीय ह्यांचे खोटे आकडे सांगून त्यांनी एवढ्या रकमेचा कर भरलेला नाही. ब्रिटनमधील हिंदी आणि भारतीय लोकांपैकी ५२% लोकांनी हा खोटेपणा केलेला आहे. कॉमन्स सभेत मि. जॉन बॉइड कार्पेटर ह्यांनी वरील माहिती सांगितली.

**पाश्चात्त्य देशांचा संरक्षण खर्च मदतीच्या आड येतो**— "पाश्चात्त्य देश संरक्षणावर एवढा खर्च करतात की, त्यामुळे गरीब देशांना मदत देण्यास फारशी कूसच राहात नाही; गेल्या वर्षी करमार्गे जमा झालेल्या रकमेपैकी ४०० डॉलर्स गरीब देशांच्या विकासासाठी देण्यात आले, तर १६,००० कोटी डॉलर्स संरक्षणावर खर्चिले गेले. स्वातंत्र्य प्राप्त झाले की आपोआप समृद्धी प्राप्त होते, ही नव्याने स्वतंत्र झालेल्या देशांची समजूत आता राहिलेली नाही; आर्थिक विकासाबाबत त्यांचा दृष्टिकोण बदलला आहे." युनायटेड नेशन्सच्या डेव्हलपमेंट प्रोग्रॅमचे अॅडमिनिस्ट्रेटर, मि. पॉल हॉफमन, ह्यांनी एका पत्रकार परिषदेत वरीलप्रमाणे सांगितले.

**हिंदी बनावटीच्या मोटारींचा दर्जा घसरला**—भारतात तयार होणाऱ्या तीनही मोटारींचा दर्जा घसरत चालला असल्याची सार्वत्रिक तक्रार असल्याचे सरकारतर्फे लोकसभेत कबूल करण्यात आले आहे.

**दरवर्षी ३ कोटी गर्भपात** — दरवर्षी सबंध जगात एकूण ३ कोटी गर्भपात होतात. भारतातील गर्भपातांची अंदाजी संख्या ६५ लक्ष आहे. सेंट्रल फॅमिली प्लॅनिंग इन्स्टिटयूटचे डायरेक्टर, कर्नल बी. एन रैना, ह्यांनी ही माहिती देतांना सांगितले, की गर्भपात बेकायदा असल्यामुळे त्यांचा अचूक अंदाज करणे कठीण आहे.

**आणखी दहा वर्षे तरी कर्जे घेत राहणार** — भारताच्या आयात-निर्गतीमधील तूट कमी कमी होत जाऊन निर्गतीच्या किंमतीने आयातीच्या किंमतीची भरपाई करता येण्याला आणखी दहा वर्षे लागतील, असे उपप्रधानमंत्री श्री. मुरारजी देसाई ह्यांनी लोकसभेत सांगितले. कर्जावरील द्याव्या लागणाऱ्या व्याजाची रक्कम सालोसाल वाढत आहे.

**परदेशी गुंतवणुकीत घट** — नव्या परदेशी भांडवलाची भारतामधील गुंतवणूक कमी कमी होत चालली आहे. १९६३-६४ मध्ये त्या गुंतवणुकीची रक्कम ६७.९ कोटी रु. होती, ती १९६७-६८ मध्ये २२.३ कोटी रु. वर आली.

**शुभचिंतन बंद** — आम्ही ह्यापुढे नव्या वर्षानिमित्त शुभचिंतनाचे संदेश पाठविणार नाही, आम्हांला येणाऱ्या संदेशांची आम्ही पोच देणार नाही, असे चीनने पेकिंगमधील सर्व देशांच्या वकिलांना कळविले आहे.

**सौंदर्यावर कर बसविण्याची सूचना** —सिलोनचे गृहमंत्री श्री. दहनायके हे ६६ वर्षांचे ब्रह्मचारी आहेत. त्यांनी स्त्रियांच्या सौंदर्यावर कर बसविण्याची सूचना केली आहे. जेवढे सौंदर्य जास्त तेवढा कर अधिक बसवावा, स्त्रियांनीच आपले सौंदर्याचे मापन करावे म्हणजे ज्यास्ती कराची वसुली होईल, असेहि ते म्हणाले.

**पार्श्वगायिकांची थकबाकी**—कु. लता मंगेशकर आणि श्रीमती आशा भोसले ह्यांचेकडे अनुक्रमे १,४२,९३६ रु. आणि १,०७,०४,३ रु. इनकमटॅक्सची बाकी थकलेली आहे. ३० नोव्हेंबर, १९६८ चे हे आकडे आहेत.

**पोस्टाच्या तिकिटांच्या विक्रीचे उत्पन्न** — पोस्टाच्या तिकिटांच्या विक्रीपासून चालू वर्षाच्या पहिल्या सहामाहीत (एप्रिल, १९६८ ते सप्टेंबर, १९६८) सरकारला २६.६८ कोटी रु. मिळाले; गतवर्षीच्या पहिल्या सहामाहीत २२.१५ कोटी रु. मिळाले होते. ह्याचा अर्थ, ४.५० कोटी रु. नी उत्पन्न वाढले.

**बिर्ला गटाच्या कंपन्यांच्या जिंदगीत वाढ** — बिर्ला गटाच्या कंपन्यांच्या जिंदगीत १९६३-६४ ते १९६६-६७ ह्या मुदतीत ४९% ने वाढ झाली; २९३ कोटी रुपयांची जिंदगी ४३८ कोटी रु.वर गेली.

**सायबेरिआचा विकास** — २५ वर्षांपूर्वी झालेल्या दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी रशिआने आपले जमेल तितके कारखाने सायबेरिआसारख्या दूर प्रदेशात हलविले. तेव्हापासून सायबेरिआच्या आर्थिक विकासाला प्रारंभ झाला. आणखी पंचवीस वर्षांच्या अवधीत सायबेरिआत नव्या कारखानदारीची प्रचंड वाढ होईल आणि खनिज तेल, ज्वालाग्राही वायू, लोहेतर धातू, लाकूड, वीज, इत्यादी वस्तूंच्या उत्पादनाच्या बाबतीत सायबेरिआ रशिआत प्रमुख स्थान पटकावेल.

**नलिका विहिरींसाठी मदत** — राजस्थान सरकारने नलिका विहिरी खोदणाऱ्या व्यक्तींना उत्तेजन देण्याचे ठरविले आहे. जे लोक अशा विहिरी खोदून त्याखाली भिजणारी जमीन लागवडीखाली आणतील त्यांना १० वर्षेपर्यंत शेतसारा माफ करण्यात येणार आहे. परंतु विहिरीच्या आसपास राहणाऱ्या लोकांना पिण्याचे पाणी पुरविण्याची जबाबदारी त्यांना स्वीकारावी लागेल.

**कच्छमधील गुरांचे स्थलांतर** — कच्छमधील २० हजार गुरे दुष्काळामुळे गुजरातच्या डांग विभागात हलविण्यात येत आहेत. गुरांच्या तांड्यांना जवळजवळ ५०० मैलांचे अंतर तोडावे लागणार आहे. गुरे रोज १० ते १२ मैल चालू शकतात. मार्गावर त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था राज्य सरकारने केली आहे.

**१० वर्षांपासून लष्करी शिक्षण** — रशियातील मुलांना १० व्या वर्षापासून लष्करी शिक्षण देण्यात येत आहे. मुद्दाम नेमण्यात आलेल्या लष्करी शिक्षकांकरवी त्यांना कवाईत, गोळीबार, विषारी वायूपासून बचाव करणारे मुखवटे वापरणे, वैद्यकीय मदत देणे आणि इतर सैनिकी प्रशिक्षण देण्यात येत आहे.

**सिकिअँग भारताचा प्रांत होता** — सध्या सिकिअँग ह्या नावाने ओळखला जाणारा प्रदेश प्राचीन काळात भारताचा भाग होता, अशी माहिती एका हिंदी संशोधकाने दिल्ली येथील भूगोल कॉंग्रेसमध्ये सांगितली. प्राचीन वाङ्मयात उत्तर कुरू ह्या भागाची माहिती आलेली आहे. हा भाग हिमालयाच्या उत्तरेस असल्याचाही उल्लेख जुन्या वाङ्मयात आहे. सध्या हा भाग रशिआ व चीन ह्यांच्यातील कटकटी निर्माण करीत आहे.

**जंगली गाढवांची खानेसुमारी** — जगात जंगली गाढवांचे एकमेव निवासस्थान म्हणून कच्छ प्रसिद्ध आहे. गुजरात राज्याच्या वन्य पशुसंरक्षण विभागाने त्यांची खानेसुमारी करण्याचे ठरविले असून त्यासाठी मध्यवर्ती सरकारकडे एका हेलिकॉप्टरची मागणी केली आहे. ते मिळाल्यास खानेसुमारी दोन दिवसांत पुरी होईल.


**शिक्षा भोगण्यासाठी थांबा**-स्वीडनमधील तुरुंगात गुन्हेगारांना ठेवण्यास पुरेशी जागा नाही. त्यामुळे शिक्षा झालेल्या गुन्हेगारांनी आपली शिक्षा भोगण्यासाठी वाट पाहावी अशी पत्रे तुरुंगाधिकाऱ्यांकडून रवाना होत आहेत. तुरुंगात जागा नसल्यामुळे १०० ते १५० गुन्हेगारांना तात्काळ तुरुंगात धाडता येत नाही. त्यांना शिक्षा भोगण्यासाठी १० महिने तरी वाट पाहावी लागणार आहे.

**उत्तर प्रदेशात रेशमाचे उत्पादन**-रेशमाच्या उत्पादनात उत्तर प्रदेश नव्याने प्रवेश करू पाहात आहे. उत्तर प्रदेशाच्या हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या भागात रेशमाचे उत्पादन करण्याचा धंदा राज्याचे उद्योग खाते सुरू करणार आहे. देहराडूनजवळील प्रेमनगर ह्या ठिकाणी धंद्याचे केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. गेल्या तीन वर्षांत ह्या ठिकाणी रेशमाच्या किड्यांची अंडी फार मोठ्या प्रमाणावर पैदा होऊ लागली आहेत.

**भारत-पोलंड करार** —भारत आणि पोलंड ह्या देशांनी परस्परात शास्त्रीय संशोधनाच्या बाबतीत सहकार्य करण्याचा करार केला आहे. उभयता देशांतील अशा प्रकारचा हा पहिलाच करार आहे. कराराची मुदत दोन वर्षांची असून ह्या अवधीत उभयता देश एकमेकांकडे शास्त्रज्ञ पाठवितील आणि शास्त्रीय संशोधनातील निष्कर्षांची माहिती पुरवितील. शास्त्रीय विषयांचे क्षेत्र करारात नमूद करण्यात आले आहे.

**ट्रॅक्टर्सच्या उत्पादनात वाढ** —गेल्या वर्षात भारतामधील ट्रॅक्टर्सच्या उत्पादनात दुपटीने वाढ झाली आहे. १९६७ साली ४० हजार ट्रॅक्टर्स निर्माण करण्यात आले होते. ह्या वर्षी ८० हजार ट्रॅक्टर्सचे उत्पादन करण्यात आले. देशातील ट्रॅक्टर्सचे कारखाने दरसाल ३० हजार ट्रॅक्टर्सचे उत्पादन करू शकतील. परंतु त्यांची संपूर्ण उत्पादनक्षमता वापरण्यात येत नाही. परिणामी, देशी बनावटीच्या ट्रॅक्टर्सचे प्रमाण फारसे बदललेले नाही.

---

उद्याचा शास्त्रज्ञ

त्याला तुमच्या मदतीची व मार्गदर्शनाची जरुरी आहे.


या विकसनशील बालशास्त्रज्ञाला उत्तेजन देऊन त्याला मदत करणे हे तुमचे पवित्र व आद्य कर्तव्य आहे, त्याला मदत म्हणजेच पर्यायाने देशाच्या प्रगतीसही मदत! म्हणून आतापासूनच आपल्या मासिक उत्पन्नातील कांही भाग नियमीतपणे ठेव म्हणून बाजूस ठेवा; त्याकरिता विशेष माहितीसाठी नजिकच्या शाखेत चौकशी करा.

तुमची जिव्हाळ्याची बँक

बँक ऑफ महाराष्ट्र लि.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

Make doubly sure by fitting



GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

## भारत-पाक सशस्त्र संघर्षावरील महत्त्वाचा ग्रंथ

### पाकिस्तानच्या महत्त्वाकांक्षेस इंग्रजांची पूर्वीची शिकवण

१९६५ साली भारत व पाकिस्तान ह्यांच्यामध्ये सशस्त्र संघर्ष झाला. ह्या संघर्षासंबंधी अलीकडे प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांत एका नवीन माहितीपूर्ण ग्रंथाची भर पडली आहे. हा ग्रंथ मि. रसेल ब्राइन्स नामक अमेरिकन पत्रकाराने लिहिलेला असून पाकिस्तानात त्यावर बंदी घालण्यात आलेली आहे. संघर्ष झाल्यानंतरच्या काही काळात जगभर पाकिस्तानाच्या मतलबी प्रचाराचा बराच प्रभाव पडलेला होता. परंतु, ह्या नव्या ग्रंथाने संघर्षातील भारताच्या बाजूला बऱ्याच मोठ्या प्रमाणावर पाठिंबा व्यक्त केला आहे. अमेरिकेने पुरविलेले घातक आधुनिक रणसाहित्य वापरून पाकिस्तानने भारतावर हल्ला केलेला होता. ही घटना लक्षात घेता ह्या ग्रंथाने खुद्द अमेरिकन लोकांच्या संघर्षाविषयीच्या कल्पना दुरुस्त होण्यास मदत होणार आहे. ग्रंथकार मि. ब्राइन्स ह्यांनी आपल्या ग्रंथाला भारताच्या फाळणीच्या पार्श्वभूमीपासून प्रारंभ केला असून भारतावर पाकिस्तानने दोनदा म्हणजे १९४७ साली व १९६५ साली आक्रमणे जाणूनबुजून केलेली होती, असे स्वच्छच म्हटले आहे. तथापि अमेरिकेने पाकिस्तानला दिलेल्या लष्करी साह्याचे मात्र त्यांनी समर्थन केले आहे. कोरिआमधील रशियाच्या प्रच्छन्न आक्रमणानंतर पाकिस्तानसारख्या सरहद्दीवरील देशांना लष्करी मदत देऊन कम्युनिझमचा प्रसार थांबविण्याचा प्रयत्न करणे अमेरिकेला भागच होते, अशी भूमिका मि. ब्राइन्स ह्यांनी घेतली आहे. जगाला पोलिसी संरक्षण देण्याची ही मरहूम डलेस ह्यांची भूमिका आता खुद्द अमेरिकेतच तितकीशी प्रभावी राहिलेली नाही. भारत हा मोठा देश असल्यामुळे अशा संघर्षात त्यालाच अधिक दोषी धरण्यात येते अशी कबुली त्यांनी दिलेली आहे.

१९६२ मधील चीनच्या भारतावरील आक्रमणानंतर भारत आपली लष्करी संघटना मजबूत करू लागला होता. भारताचे लष्करी सामर्थ्य वरचढ होण्यापूर्वी आणि स्वतःकडे असलेल्या आधुनिक शस्त्रास्त्रांचा युद्धात फायदा मिळण्याची शक्यता असतानाच पाकिस्तानने १९६५ मधील आक्रमण केले असावे असा त्यांचा अंदाज आहे. अर्थात, पाकिस्तानच्या लष्करी व्यूहाचा हेतू त्यांनाही सांगता आलेला नाही. पाकिस्तानच्या राजकीय हेतूविषयी लिहिताना मि. ब्राइन्स म्हणतात की काश्मीरचा प्रश्न हा अधिक मोठ्या महत्त्वाकांक्षा साधण्यासाठी उपयोगात आणलेली ढाल असण्याची शक्यता आहे. पाकिस्तानचे अध्यक्ष हे अलीगड विद्यापीठाचे विद्यार्थी होते. ह्या विद्यापीठाच्या काही ब्रिटिश प्रिन्सिपॉलांच्या शिकवणुकीचा प्रभाव त्यांच्यावर पडलेला असणार. ह्या ब्रिटिश प्रिन्सिपॉलांनी उत्तर भारतात मुसलमानांचीच सत्ता असावी अशा प्रकारचा पद्धतशीर प्रचार केलेला आहे. भारताची फाळणी होण्यापूर्वी हिंदी लष्करात अर्धीअधिक भरती पंजाबी मुसलमानांची होती आणि त्यांना भारताचा खड्गहस्त असे मानण्यात येत होते. पाकिस्तानच्या भारतविरोधी प्रचारात अकबरापेक्षा औरंगजेबाचा अधिक प्रामुख्याने उल्लेख असतो. त्यावरून भारताचे राज्य ब्रिटिशांनी मुसलमानांपासून घेतले असा पाकिस्तानचा दावा असल्याचे उघड दिसते, आणि ह्या दाव्यावरून पाकिस्तानच्या महत्त्वाकांक्षेची कल्पनाही येते. १९६५ च्या युद्धात भारताने केलेल्या काही लष्करी चुकांचाही ग्रंथात उल्लेख आहे. भारताने कराचीवर हल्ला केला नाही अगर पाकिस्तानचा उत्तरेकडे जाणारा एकमेव रेल्वेमार्ग तोडण्याचाही प्रयत्न केला नाही. त्याचप्रमाणे असंरक्षित अशा पूर्व पाकिस्तानवर सशस्त्र कारवाई केली नाही.

---

### पांचव्या पोलादाच्या कारखान्याविषयी सल्ला

जपानच्या फुजी आयर्न अँड स्टील कंपनीचे अध्यक्ष अलीकडेच भारतात येऊन गेले. भारतात सार्वजनिक विभागात ५ वा पोलादाचा कारखाना स्थापन करण्यापूर्वी, संबंधितांनी चालू पोलाद कारखान्यांच्या विस्ताराच्या अर्थशास्त्राचा नीट अभ्यास करावा असा सल्ला त्यांनी दिला आहे. म्हैसूर आणि आंध्र राज्यांत पोलादाचे कारखाने काढण्याच्या प्रयत्नाविषयीही त्यांनी सावधगिरीचा इशारा दिला. ते म्हणाले की ह्या राज्यांतून मोठाले पोलाद कारखाने काढण्यापूर्वी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत टिकू शकेल अशा किंमतीला तेथे पोलाद उत्पन्न होईल, ह्याविषयी खात्री झाली पाहिजे. कारण, भारतामधील पोलादाची मागणी अपुरी झाल्यास पोलाद परदेशी निर्यात करावे लागेल.

---

### देना बँकेच्या एकट्या मुंबईत ५० शाखा

एकाच शहरात ज्यास्तीत ज्यास्त शाखा असण्याचा मान देना बँकेने पटकाविला आहे. तिच्या मुंबईत आता ५० शाखा आहेत. मे, १९३८ मध्ये तिची स्थापना झाली. आता तिच्याकडे ५,००,००० खात्यांत मिळून १०० कोटी रुपयांच्या ठेवी आहेत, तिचे खेळते भांडवल ११० कोटी रु. आहे आणि गंगाजळी १५ कोटी रु. आहे. १४ राज्यांत मिळून तिच्या २११ शाखा आहेत.

---

### सरकारी अधिकाऱ्यांच्या परदेशीय पत्नी

मध्यवर्ती सरकारच्या ४१ अधिकाऱ्यांनी परदेशीय स्त्रियांशी विवाह केलेला आहे. त्यांपैकी १६ अधिकारी परराष्ट्रीय खात्यात आहेत.

---

### निर्यातीसाठी केळींच्या बनांची लागवड

निर्यात व्यापारात मालाची जितकी विविधता असेल तितकी हितकर समजतात. कारण, अनेक वस्तू निर्यात होत असल्या म्हणजे एखाद्दुसऱ्या वस्तूचा भाव घटला तरी निर्यातीच्या एकूण प्राप्तीत फारशी घट होत नाही. भारतामधून फळे व फुले निर्यात करण्याची शक्यता अलीकडे दिसू लागली आहे. फळांच्या निर्यातीचा एक मोठा प्रयत्न केळी व फळे निर्यात कॉर्पोरेशनतर्फे ४ थ्या पंचवार्षिक योजनेत करण्यात येणार आहे. तो यशस्वीपणे अमलात आणला गेला तर भारताला दरसाल ४० कोटी रुपयांचे परदेशीय चलन मिळू शकेल. केळयांची निर्यात करण्यासाठी ४० हजार एकरांत केळयांची बने लावण्याचा विचार करण्यात येत आहे. ही नवी उत्पादनकेंद्रे ९ बंदरांच्या जवळपास स्थापन करण्यात यावयाची आहेत. केळयांच्या लागवडीसाठी पुरेसे खत घालण्यात आले आणि पिकाच्या संरक्षणाची काळजी घेण्यात आली तर सध्याच्या उत्पादनापेक्षा १० लाख टन अधिक केळी निर्माण करता येतील आणि त्यांपैकी ६ लाख टन केळी प्रारंभी निर्यात करता येतील असा अंदाज आहे. लागवड करणाऱ्या बागाइतदारांना आपली नोंद कॉर्पोरेशनमध्ये करावी लागेल आणि स्टेट बँक ऑफ इंडिआशी करार करून स्वतःला लागणाऱ्या कर्जपुरवठ्याची सोय करून घ्यावी लागेल. एकरामागे बागाइतदारांना १,५०० रुपये कर्ज बँकेतर्फे मिळेल. परदेशांतील ग्राहकांच्या रुचीला मानवतील अशाच प्रकारच्या केळयांची लागवड हाती घेण्यात येणार आहे. जपान व रशिआ ह्यांत लोकप्रिय झालेल्या केळयांच्या जाती प्रथम लावण्यात येणार आहेत.

### सरकारी मोटारगाड्यांचा गैरवापर

शेजारच्या ठिकाणी काहीतरी समारंभात भाग घेण्याच्या निमित्ताने तिरुपतीसारख्या देवस्थानाची यात्रा करण्यासाठी सरकारी मोटारगाड्या न वापरण्याची विनंती आंध्र प्रदेशाच्या विधान सभेत एका काँग्रेस सदस्याने मंत्र्यांना केली. "मंत्र्यांना देवदर्शनाला जावयाचे असेल, तर त्यांनी खाजगी मोटारगाड्या वापराव्या. स्वतःच्या नोकरांच्या हाती सरकारी मोटारगाड्या पडू देऊ नयेत. हॉटेले आणि पानपट्ट्याची दुकाने ह्यांसमोर सरकारी मोटारगाड्या तासन्तास उभ्या केल्या जाणे अप्रस्तुत आहे." असेही ते म्हणाले.

### लंडन येथील हाय कमिशनच्या इमारतीवर पारतंत्र्याचे चिन्ह कायम

लंडन येथील इंडियन हाय कमिशनच्या इमारतीवरील ब्रिटिश राजमुकुट कोरलेला दगड सरकारने अद्याप न हलविल्याबद्दल लोकसभेने सरकारला खूप दोष दिला. गेली २० वर्षे हाय कमिशन काय करीत होते, असा प्रश्न विचारण्यात आला. लवकर कृती करण्याची हाय कमिशनला सूचना देण्यात आली आहे असे सरकारतर्फे सांगण्यात आले.


सुरक्षितता! आणि वाढ!

| मुदत | व्याज |
|---|---|
| ९१ दिवस | ५·२५ |
| ६ महिने | ५·७५ |
| १ वर्ष | ६·२५ |
| २ वर्षे | ६·५० |
| ३ वर्षे | ६·७५ |
| ५ वर्षे | ७·२५ |
| ७ वर्षे | ७·५० |
| ९ वर्षे | ७·६२ |

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

प्रमुख कचेरी-चिरमुले निकेतन, राजपथ सातारा
स्थापना १९३६
महाराष्ट्रांत सर्वत्र शाखा

मावळा सातारा एस. पी. ४/६८

## जागतिक आरोग्य संघटनेचे आत्मघातासंबंधी पुस्तक

माणसाची जगण्यासाठी अहर्निश धडपड चालू असतानाच अनेकजण आत्मघातास प्रवृत्त होतात. आत्मघात करणाऱ्याला त्यापासून वाचविण्याचे १०० टक्के यशस्वी उपाय अशक्यच आहेत. तथापि संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या आरोग्य संघटनेने अशा उपायाबद्दल काही सूचना केल्या आहेत, आणि त्याचबरोबर आत्मघाताच्या प्रकारासंबंधी बरीचशी माहितीही प्रकाशित केली आहे. ह्या ८४ पानांच्या छोट्या पुस्तकात दिलेली माहिती उद्बोधक आहे. आत्मघातास प्रवृत्त होणाऱ्यांना त्यापासून मागे फिरविण्यासाठी चार अवस्थांत उपाय योजण्याची शिफारस करण्यात आली आहे. सल्ला, मानसिक उपचार, हितसंरक्षक उपाय आणि वैद्यकीय मदत ह्या रूपात ही मदत त्यांना देण्यात यावयाची आहे. आत्मघातासंबंधी मुख्यत: ४ अवस्थांत मदत करता येते. प्रथम आत्मघाताची इच्छाच उद्भवू नये म्हणून प्रयत्न करता येतील. त्यानंतर आत्मघाताचा पहिला प्रयत्न फसल्यावर उपाय सुचविता येतील. पुन्हा पुन्हा आत्मघाताची वृत्ती दिसून आल्यास उपाय करता येतील आणि आत्मघाताचा प्रयत्न यशस्वी झाल्यावरही त्यासंबंधी मीमांसा करून पुढे मार्गदर्शक ठरतील असे उपाय सुचविता येतील. पुस्तकातील माहितीवरून असे दिसून येते की, दररोज सुमारे १ हजार लोक अथवा दरसाल सुमारे ५ लाख लोक आत्मघात करून घेतात. तथापि, आत्मघाताच्या यशस्वी प्रयत्नाबरोबरच फसलेल्या प्रयत्नांची संख्याही कमी नसते. यशस्वी आत्मघाताच्या संख्येच्या ८ पट अयशस्वी प्रयत्नांची संख्या असावी असा अंदाज करण्यात आला आहे. तेव्हा आत्मघाताचे प्रयत्न करणारांची संख्या लक्षावधी असली पाहिजे.

आत्मघातासंबंधी दिलेल्या माहितीवरून असे आढळून येते की एकंदरीने स्त्रियांपेक्षा पुरुष अधिक प्रमाणात आत्मघात करून घेतात. मानसिक अनारोग्याने पछाडलेले लोक, दारूचे व्यसन जडलेले लोक, घटस्फोटित स्त्रिया, परदेशांतून आलेले व एकटे राहणारे बेकार, उध्वस्त संसारामुळे उघडी पडलेली मुले, विद्यापीठातील विद्यार्थी आणि वृद्ध ह्या लोकांची आत्मघाताकडे अधिक प्रवृत्ती दिसून येते. वृद्धांच्या आत्मघाताची कारणे अनेक आढळून येतात. मानसिक अगर शारीरिक आजाराने त्रस्त झालेले, एकटेपणाची भावना असह्य झालेले, प्रिय माणसाच्या मृत्यूची खंत घेतलेले वृद्ध आत्मघातास प्रवृत्त होतात. त्याचप्रमाणे नेहमीची जीवनाची घडी विस्कटल्यामुळे अगर निवृत्त जीवन जगावे लागल्यामुळेही वृद्ध आत्महत्या करतात. निवृत्त जीवनात उत्पन्नात एकमद घट होते. त्याचाही परिणाम त्यांच्या मनावर फार होतो. विद्यापीठात अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांत कुटुंबातील संघर्ष आणि प्रेमभंग ही आत्मघाताची प्रभावी कारणे दिसून येतात. आत्मघाताचे साधन व प्रकारही पुष्कळ दिसून येतात. नायजेरिआंतील लोक गळफास लावून घेतात, तर ब्राझिलमधील लोक विष घेतात. इंग्लंड, वेल्स आणि ऑयर्लंडमधील लोक विषारी वायूचा उपयोग करतात. अमेरिकेत पुरुष बहुधा पिस्तुलाचा उपयोग करतात; आणि स्त्रिया विषाचा उपयोग करतात. स्वित्झर्लंडमधील लोक स्वयंपाकासाठी वापरण्यात येणाऱ्या विषारी गॅसचा उपयोग करू लागल्यावर तो विषरहित करण्यात आला. मग आत्मघात करणाऱ्यांची संख्या कमीही झाली. परंतु, लोकांनी पाण्यात बुडवून घेऊन आत्महत्या करणे सुरू केले, आणि मग पुन्हा आत्मघात करणाऱ्यांची संख्या वाढू लागली.

## कीडनाशक रसायने वापरण्यातील धोका

शेतात उगवलेल्या पिकांचे कीड व रोगराईपासून संरक्षण करण्यासाठी अलीकडे सर्व जगभर रसायने फवारण्यात येत असतात. भारतातही ती वापरण्यात येतात. अशी रसायने वापरल्यामुळे पिकांचे संरक्षण होते. परंतु ही रसायने विषारी असल्यामुळे त्यांच्या वापरामुळे बचावलेली पिके माणसांना व जनावरांना घातक ठरण्याचा धोका असतो. शेतीत वापरण्यात येणाऱ्या ह्या रसायनांचा ह्या दृष्टीने विचार करून शिफारसी करण्यासाठी सरकारने तज्ज्ञांची एक कमिटी नेमली होती. नियोजनमंडळाचे माजी सभासद प्रा. एम्. एस्. थॅकर ह्या कमिटीचे अध्यक्ष होते. कमिटीने सध्या वापरल्या जाणाऱ्या विषारी रसायनांचा अभ्यास करून असा निष्कर्ष काढला आहे की, ह्या रसायनांपैकी काही फार विषारी असून त्यांच्याऐवजी काही वेगळी कमी विषारी रसायने वापरणे अगत्याचे आहे. सध्या वापरात असलेल्या "पॅरॅथिऑन" व 'एन्ड्रिन' ह्या रसायनांमुळे सर्व जगात अनेक माणसे दगावलेली आहेत, ही गोष्ट कमिटीने आपल्या अहवालात नमूद केली आहे; आणि ह्याहीपेक्षा अधिक विषारी रसायने वापरण्यात येण्याच्या संभवाविरुद्ध धोक्याचा इशारा दिला आहे. सध्या वापरण्यात येणारी कीडनाशक रसायने अल्प किंमतीत मिळू शकतात. भारतासारख्या गरीब देशाला सध्या तरी तीच वापरण्याखेरीज गत्यंतर नाही. ह्यापेक्षा अधिक महाग पण परिणामकारक रसायने वापरणे सध्या तरी परवडण्यासारखे नाही. सध्याच्या रसायनांची जागा दुसरी अल्प किमतीची रसायने घेऊ शकत नाहीत तोपर्यंत दुसरा मार्ग नाही. दरम्यान त्यांच्या वापरातील धोका कमी करण्याचे प्रयत्न आवश्यक आहेत.

## पन्नासात एकजण सार्वजनिक नोकर

भारतात प्रत्येक पन्नासात एकजण तरी सरकारी, निम-सरकारी किंवा स्थानिक संस्थांचा नोकर असतो. अशा नोकरांची एकूण संख्या मार्च १९५६ मध्ये ५२·३४ लक्ष होती, ती जून १९६७ मध्ये ९६·२७ लक्षांवर गेली आहे.

### केसांच्या निर्यात व्यापारात अडचणी


गेल्या दोन वर्षांत भारतामधून केसांची व टोपांची निर्यात करावयाच्या व्यापाराला भरभराट आली होती. ह्या व्यापाराची मोठ्या व्यापारात गणना होऊ लागली होती. परंतु आता ह्या व्यापारापुढे गंभीर अशा अडचणी उद्भवल्या आहेत. १९६६ मध्ये केसांची निर्यात करणारे व्यापारी जवळजवळ नव्हतेच. आता त्यांची संख्या हजारोंनी मोजता येईल. अलीकडे ह्या व्यापाऱ्यांनी मानवी केसांची खरेदी मोठ्या प्रमाणावर चालविल्यामुळे मालाच्या किमती भडकल्या आहेत. पण त्याबरोबर मालाचा दर्जा मात्र सुधारलेला नाही. केस विकत घेणाऱ्या काही परदेशी व्यापाऱ्यांनी केसांच्या निकृष्ट दर्जाबद्दल तक्रारी केल्या आहेत. भारतात निर्यात मालाची तपासणी करण्याची पद्धत असूनही हा प्रकार चालू असल्याबद्दल त्यांनी नापसंती व्यक्त केली आहे. आता टोपांना मागणी कमी झाली आहे. तरी पण संस्कारित केसांची मागणी वाढली आहे. जे अमेरिकन व्यापारी भारताकडून केस विकत घेतात, त्यांना अमेरिकेतील बदलत्या फॅशनचा विचार करावा लागतो. कधी त्यांना लांब केस हवे असतात तर कधी आखूड हवे असतात. केसांच्या रंगाच्या छटाही ते वारंवार बदलतात. त्यामुळे व्यापार-मंडळाला सतत बदलणारी मागणी पुरविणे अवघड जात आहे. शिवाय टोपांच्या निर्यात व्यापारात जोराची स्पर्धा सुरू झालेली आहे. टोप तयार करण्यासाठी काही परदेशी माल वापरावा लागतो. त्यामुळे त्यांच्या किमती खूप वाढतात, आणि मग इतर देशांतील स्वस्त टोपामुळे भारतामधील टोप कमी खपू लागतात. गेल्या वर्षी व्यापार-मंडळाने मानवी केस आणि त्यापासून बनविलेले टोप ह्यांची निर्यात करून १ कोटी रुपयांपेक्षाही अधिक परदेशी चलन मिळविले. ह्या वर्षी मात्र अर्ध्या कोटीचे चलन मिळणेही कठीण दिसत आहे.

---

### सरकारी नोकरांचे परदेशांचे दौरे व भेटी

जानेवारी १९६७ ते जून १९६८ ह्या अठरा महिन्यांच्या काळात भारत सरकारच्या निरनिराळ्या खात्यांतील १,६०० अधिकाऱ्यांनी परदेशांना भेटी दिल्या अगर दौरे काढले. खाजगी कामासाठी परदेशी गेलेल्या सरकारी नोकरांचा ह्या आकड्यात समावेश नाही. त्याशिवाय काही प्रकारचे तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी अनेक सरकारी नोकरांना परदेशी पाठविण्यात येते. मध्यवर्ती सरकारच्या व्यापार खात्याने सर्वांत जास्ती म्हणजे २९१ नोकरांना वरील अवधीत परदेशी धाडले. त्यांच्यासाठी ४४ लाख रुपये खर्च झाले. परदेशी व्यवहार खात्याने २४७ अधिकारी पाठविले. त्यांच्यासाठी १९·६६ लाख रुपये खर्च झाले. संरक्षण खात्याने २०३ अधिकारी पाठविले. त्यांच्यासाठी १२·३२ लाख रुपये खर्च झाले. अणुशक्ती खात्याने १२५ अधिकारी पाठविले. त्यांच्यासाठी ९·२५ लाख रुपये खर्च झाले. नोकरांच्या परदेश प्रयाणापायी भारत सरकारला १·३० कोटी रुपये खर्च आला.


महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा.
४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड.

शिवाय बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

**— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —**

विश्रामबाग – सांगली (महाराष्ट्र)



## महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.

मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी : ९, बँक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

: विभागीय कचेरी : महाल नागपूर.

दूरध्वनी :– २५९८६४, २५९९९७, २५०१८९, २६९६६७

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल व गंगाजळी फंड | ... रु. | ११,९८,८४,००० |
| ठेवी | ... रु. | ६३,१८,९३,००० |
| खेळते भांडवल | ... रु. | १,१३,२३,७१ ००० |

: बृहन् मुंबईतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगाव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (पूर्व) (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम)

: नागपूर विभागातील शाखा :

(१) सिताबर्डी (२) धरमपेठ (३) धन्तोली (४) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरी वर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे, सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. वसंतराव पाटील, चेअरमन

डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर. श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.

SCG-1 HIN

# नहीं—
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण है: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



कमर्शल सोडा वाटर यंत्र

घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५११७१ कारखाना: १७६१०२

## शहरातील जमिनींच्या वाढत्या किमती

आंतरराष्ट्रीय भूगोल काँग्रेसच्या निमित्ताने शहरांतील जमिनींच्या उपयोगासंबंधी एक परिसंवाद भरविण्यात आला होता. परिसंवादाचे उद्घाटन करताना आंध्र प्रदेशाचे गव्हर्नर श्री. खंडूभाई देसाई म्हणाले की शहरांतील जमिनींच्या किमती ज्या वाढतात त्यासाठी जमिनीच्या मालकांनी काही केलेले नसते. सरकार औद्योगीकरणासारख्या काही योजना हाती घेते. त्यामुळे जमिनीच्या किमती झपाट्याने वाढत जातात. वाढलेल्या किमतीमुळे जमीनमालकांना होणारा नफा हे अनार्जित उत्पन्नच म्हटले पाहिजे. म्हणून अशा जमिनींच्या चढ्या भावाने होणाऱ्या विक्रीतील नफ्याचा मोठा हिस्सा समाजाला काढून घेण्याचा हक्क आहे. शहरात नव्याने निघणाऱ्या कारखान्यांसाठी परवाने देण्यावर निर्बंध घालण्यात आले पाहिजेत. एखाद्या कामासाठी दिलेली जमीन जर त्या कामासाठी वापरण्यात आली नाही तर तिची मालकी परत सरकारकडे गेली पाहिजे. कोणत्याही शहराची लोकसंख्या ५ लाखांपेक्षा अधिक होऊ न देण्याची खबरदारी घेण्यात आली पाहिजे. जमिनीच्या खरेदीविक्रीला बऱ्याच वेळा सट्टेबाजीचे स्वरूप येते. सट्टेबाजीच्या अशा व्यवहारांवर बंधने घालण्यात आली पाहिजेत. त्याचप्रमाणे शहरात उद्याने स्थापन करण्यापेक्षा त्याच्याभोवती १० मैलांच्या परिसरात भाजीपाला लावण्यासाठी व गुरांची पैदास करण्यासाठी जागा राखून ठेवण्यात याव्यात. शहरात उद्याने व बागबगिचे तयार करण्याच्या धोरणामुळे जमिनींच्या किंमती अधिकच भडकत जातात. संपत्तीचे केंद्रीकरण टाळण्यासाठी उद्योगधंदे शहरातच न काढता त्यांची पसरण विस्तृत भूप्रदेशावर करण्यात आली पाहिजे.

---

### एका वर्षात १,३०५ भूकंप

एक वर्षापूर्वी कोयनेचा प्रचंड भूकंप झाला, तेव्हापासून १२-१२-१९६८ पर्यंत, पुणे येथील वेधशाळेत १,३०५ भूकंपांची नोंद झालेली आहे.

### अभयवचनामुळे ३,४६,०४३ नवे रेडिओ लायसेन्ज


ज्यांनी रेडिओचे लायसेन्स घेतलेले नाही, अशांना तीन महिने मुदतीचे अभयवचन दिल्यामुळे ३,४६,०४३ रेडिओंना नव्याने लायसेन्स देण्यात आले.

### लक्ष्मणराव किर्लोस्करांच्यासाठी पोस्टाचे खास तिकीट

कारखानदारीचे आद्य प्रवर्तक श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त पोस्टाचे एक खास तिकीट दि. २० जून, १९६९ रोजी काढण्यात येणार आहे. लोकोत्तर व्यक्तींच्या स्मृत्यर्थ १९६९ मध्ये एकूण १५ तिकिटे काढण्यात येतील.

---

**अर्थ** (पाक्षिक) महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते. वा. व. रु. ६=०० ट. ख. सह "दुर्गाधिवास" पुणे ४.




हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ६९१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.